# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९९९, २५५७७९००
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

१९६
११/०७/२०२५

जा.क्र.झोपुप्रा/तां.३/अंभोप/मा.क्र.२५५/१९९०/२०२५
दि. ०८/०७/२०२५

## अंतिम भोगवटा प्रमाणपत्र (पुनर्वसन घटक)

वाचा - १) प्रथम बांधकाम परवानगी (C.C.) क्र.झोपुप्रा/१०४४/२०१९, दि.०७/०५/२०१९.
२) सुधारित बांधकाम परवानगी क्र. झोपुप्रा/४५७८/२०१९ दि.०५/०९/२०१९.
३) सुधारित बांधकाम परवानगी क्र. झोपुप्रा/९८१/२०२२ दि.११/०७/२०२२.
४) सुधारित बांधकाम परवानगी क्र. झोपुप्रा/११६०/२०२५ दि.२१/०४/२०२५.
५) अंशतः भोगवटा प्रमाणपत्र दि.१३/०६/२०२५.
६) विकसक मे.साई मिरॅकल डेव्हलपर्स यांचे दि. ०३/०७/२०२५ रोजीचे अंतिम भोगवटा मागणी पत्र.
७) दि.०८/०७/२०२५ रोजीची मंजूर कार्यालयीन टिपणी.

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

---

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ४५ प्रमाणे मौजे पिंपरी सि.स.नं.६३३३,( स.नं. ९९ पै. ), पुणे येथील ओपन स्पेसवर वसलेल्या झोपडीधारकांना मौजे पिंपरी सि.स.नं.६३६७,( स.नं.११०,) या पिंपरी-चिंचवड मनपाच्या मालकीच्या आरक्षण क्र.७९ बेघरांसाठीघरे (HDH) या भूखंडावर राबविणेत येणाऱ्या प्रकल्पातील पुनर्वसन इमारतीसाठी या कार्यालयाकडून क्र. झोपुप्रा/तां३/मा. क्र.२५५/११६०/२०२५ दि.२१/०४/२०२५ अन्वये सुधारित बांधकाम परवानगी देणेत आली आहे. सदरील बांधकाम परवानगी प्रमाणे इमारतीमधील काम पूर्ण झाल्याने, सदर इमारतीमधील १ ते १४ मजल्यावरील सदनिकेसाठी वाचा क्र.५ अन्वये अंशतः भोगवटा प्रमाणपत्र अदा करणेत आला आहे. आता सदर योजनेचे विकसक मे.साई मिरॅकल डेव्हलपर्स यांनी बिगर-निवासी सदनिकाकरिता अंतिम भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याबाबत प्रकल्पाचे विकसक उपरोक्त वाचा ६ मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केला असता, त्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संदर्भ क्र.७ अन्वये मंजुरी दिली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे इमारतीसाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० चे नियम क्र.२.११ अन्वये अंतिम भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे. मंजुर बांधकाम नकाशानुसार पुनर्वसन इमारतीचा अंतिम भोगवटा अदा करावयाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(पुनर्वसन इमारत)

| अ.क्र | मजले | प्रत्यक्ष मंजूर नकाश्यानुसार | | एकुण सदनिका |
|---|---|---|---|---|
| | | पुनर्वसन घटक | | |
| | | Resi | Comm | |
| १. | ग्राउंड फ्लोअर | पार्किंग + ०१ शॉप +१ ते ९३ कनव्हीनीयन्स शॉप +०२ मीटर रूम +०१ सोसायटी ऑफीस | | पार्किंग + ०१ शॉप +१ ते ९३ कनव्हीनीयन्स शॉप +०२ मीटर रूम +०१ सोसायटी ऑफीस |
| २. | पहिला मजला | Hall no.९४ | | Hall no.९४ |
| | एकूण | ०० | ०१ शॉप + १ ते ९३ कनव्हीनीयन्स शॉप + Hall no.९४ | पार्किंग + ०१ शॉप +१ ते ९३ कनव्हीनीयन्स शॉप +०२ मीटर रूम +०१ सोसायटी ऑफीस Hall no.९४ |

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

<u>पुनर्वसन घटक</u> :- पार्किंग + ०१ शॉप +१ ते ९३ कनव्हीनीयन्स शॉप+०२ मीटर रूम + ०१ सोसायटी ऑफीस.

**प्रस्तुत प्रकरणी खालील नमूद अटी व शर्तीस अधीन राहून अंतिम भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.**

**अटी:-**

१) विषयांकित इमारतीस योग्य प्रकारची आणि इमारतीच्या बाहेरच्या मोकळया बाजूस उघडणारी लीफ्ट व जीना मंजूर नकाशाप्रमाणे बांधलेली आहे. तसेच मंजूर नकाशानुसार Refuge Area इमारतीमध्ये ८व्या व १३ व्या मजल्यावर तरतुद केली आहे.

२) विषयांकित योजना क्षेत्रासाठी मंजूर नकाशानुसार उत्तर,व दक्षिण बाजूस सिमाभिंत बांधण्यात आली आहे.

३) मंजूर नकाशानुसार स्कुटर पार्किंग व्यवस्था करण्यात आलेली आहे.

४) मंजूर नकाशानुसार सोसायटी ऑफिस टॉयलेटसह मंजुर नकाशानुसार इमारतीकरिता पाण्याची टाकी/व्हेंटीलेशन डक्ट/जिने/लिफ्ट/पाईप फिटींग इ. बाबी योग्य प्रकारे पुर्ण केलेल्या आहेत.

५) सदर बाबतीत अग्निशामन विभागाकडील दि.०२/०७/२०२५ रोजीची Final Fire NOC विकसक यांनी या कार्यालयाकडे सादर केली आहे. सदर Final Fire NOC मधील अटी व शर्ती विकसक यांच्यावर बंधनकारक राहील.

६) विकासकाने दि.०८/०७/२०२५ रोजी या कार्यालयाकडे सादर केलेल्या पत्रामधील सर्व अटी व शर्ती विकसक यांच्यावर बंधनकारक राहील.

७) इमारतीच्या उत्तर, दक्षिण, पूर्व व पश्चिम बाजूंनी असणारे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal open space) कोणत्याही अडथळ्याशिवाय पुर्णपणे खुले आहे.

८) मौजे पिंपरी स.नं. ९९ पै., सि.स.नं.६३३३, पुणे येथील मंजूर लेआऊट मधील ओपन स्पेस क्षेत्रावरील सर्व झोपडया निष्काशीत करून सदर मोकळा भूखंड पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस हस्तांतरित करणे विकसक यांच्यावर बंधनकारक राहील.

९) योजनेतील इमारतीमध्ये असलेल्या Lift, Pump, STP, Generator Backup, Fire Fightening इत्यादीबाबत सदनिका / इमारतीचा ताबा दिल्यापासुन ५ वर्षांकरिता वार्षिक देखभाल करारनामा (AMC)करणे बंधनकारक राहिल.

१०)प्रकल्पा अंतर्गत योजना क्षेत्रातील खुली जागा आणि सार्वजनिक सुविधा सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

११)सदर झोपडपट्टी योजनेतील इमारतीमधील पुनर्वसन सदनिकांचे वाटप, भोगवटापत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांमध्ये सोडत पद्धतीने वितरीत करून घेणे आवश्यक आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दि. ०८/०७/२०२५ रोजीचे मान्यतेने**

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

**सहायक संचालक नगर रचना,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.**

**प्रत:-१) मे.साई मिरॅकल डेव्हलपर्स १ ते ७ शॉवकर मंजील, नेहरुनगर, पिंपरी, पुणे-१८.**

**२) वास्तुविशारद - श्री राहुल माळवदकर ६७२/६७३, लोकेश सोसायटी,बी समर्थ इमारत,प्लॉट क्र १० बिबवेवाडी, पुणे - ३७.**

**३) तहसिलदार,ताबा विभाग,झोपुप्रा,पुणे,यांना माहितीस्तव अग्रेषित.**

**४) संगणक अधिकारी,झोपुप्रा,पुणे,यांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.**